**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.**

क्रमांक कोविमं/लेखा/नोंदणी शुल्क/१९-२०/ 1650
कोल्हापूर ४१६००४
दिनांक ३१/८/२०१९

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय:** इ. १० वी व इ. १२ वी सन २०१९-२० साठीचे वार्षिक नोंदणी शुल्क वर्गणी बाबतचे परिपत्रक

संदर्भ: १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक कोविमं/लेखा/नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी/५३६, दिनांक ०७/६/२०१९

२) मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांक रा.मं./लेखा-६/अंदाजपत्रक/ नोंदणीशुल्क/४४८१, दिनांक ३०/८/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भ क्रमांक १ नुसार कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुखांना **शैक्षणिक वर्ष २०१९-२०** या वर्षासाठी नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी नियमित शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले होते.

सबब संदर्भ क्रमांक २ नुसार कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यकक्षेतील ज्या गावातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे ऑगस्ट २०१९ मध्ये अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त व आपत्तीग्रस्त झाली आहेत अशा गावातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे नोंदणी शुल्क नियमित दराने (विनादंड) दिनांक १६/९/२०१९ पर्यंत चलनाद्वारे जमा करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. दिनांक १७/९/२०१९ पासून पाठविल्या जाणा-या नोंदणी शुल्कासाठी शाळांना / महाविद्यालयांना दंडासहीत नोंदणी शुल्क ही संदर्भ क्रमांक १ रोजीच्या परिपत्रकान्वये आकारण्यात येईल.

31/8

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
सर्वे नं ८३२ – ए, फायनल प्लॉट नं १७८, १७९, बालचित्रवाणीजवळ, आघरकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००४

Email :secretary.stateboard@gmail.com
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 & EPABX -25705000 Fax : 25665807 & Secretary(P) : 25651750

तातडीचे / ईमेलद्वारे

क्र.रा.मं./लेखा-६/अंदाजपत्रक/नोंदणीशुल्क/ ४५५८।
पुणे ४११ ००४.
दिनांक – ~~२७~~ ३० ऑगस्ट, २०१९

प्रति,
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/
नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/
नाशिक/लातूर/कोकण.

विषय – शाळांची विनादंड नोंदणी शुल्क भरणेकरिता मुदतवाढ देणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, कोल्हापूर विभागामध्ये दि.५ ऑगस्ट, २०१९ पासून पूरस्थिती निर्माण झालेमुळे काही शाळा नोंदणी शुल्क भरु शकल्या नाहीत, त्यामुळे नोंदणी शुल्क विनादंड भरणेस मुदतवाढ मिळणेबाबत काही घटकांकडून राज्यमंडळास विनंती करण्यात आली आहे. सबब सर्व विभागीय मंडळ कार्यक्षेत्रातील ज्या गावातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये ऑगस्ट २०१९ मध्ये अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त अथवा आपत्तीग्रस्त झाली आहेत अशा गावातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे नोंदणी शुल्क नियमित दराने (विनादंड) दि.१६ सप्टेंबर, २०१९ पर्यंत स्विकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे. त्यापुढे नोंदणी शुल्क स्विकारण्याची कार्यवाही प्रचलित पध्दतीने (दंडासह) करण्यात यावी. सदरची बाब आपल्या कार्यकक्षेतील संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालये यांना आपल्या स्तरावरुन कळविण्याची कार्यवाही करावी.

सचिव
राज्यमंडळ, पुणे ४

प्रत माहितीस्तव –
०१. श्री खंडेराव जगदाळे, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य (कायम) विना अनुदानित शाळा कृती समिती, कोल्हापूर.
०२. परीक्षा शाखा, राज्यमंडळ पुणे